**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२३/२०२३-२४/०१/वेतनपथक, पुणे दिनांक - २० मार्च, २०२३

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे.

**विषय - १. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणे.**
**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत.**
**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत.**
**४. अर्जित रजेबाबत.**
**५. तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांच्या मानधनाची रक्कम.**
**६. प्राचार्य मान्यतेबाबत.**
**७. माहे मार्च, २०२३ चे वेतनसाठी आवश्यक असलेल्या तरतूदीबाबत.**

**१. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणेबाबत -**

या विभागाच्या अधिपत्याखालील ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये नव्याने कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत व त्यांची वेतननिश्चिती सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग पुणे यांनी करुन त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे त्यांच्या टेम्प्लेट ४ ला मान्यता देण्यासाठी ज्या महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये शासन मान्य पदावर कर्मचा-यांच्या नव्याने नियुक्त्या झालेल्या आहेत फक्त अशाच महाविद्यालये/ अकृषी व अभिमत विद्यापीठातील संबंधीत कर्मचा-यांची माहिती टेम्प्लेट ४ मध्ये भरुन या कार्यालयास फॉरवर्ड

करावी व अशा नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबतच्या सर्व कागदपत्रांसह आणि टेम्प्लेट ४ सह **खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत -**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की माहे मार्च, २०२३ मध्ये ब-याच महाविद्यालयांमधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बदल्या झालेल्या आहेत. त्यामुळे अशा सर्व कर्मचा-यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन त्याप्रमाणे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये योग्य ते बदल करण्यासाठी खालील विवरणपत्रामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती Microsoft Excel मध्ये आणि सर्व संबंधीत कागदपत्रांसह **(पीडीएफ) खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे. <u>तसेच संबंधीत कर्मचा-यांना एचटीई सेवार्थ प्रणालीमधून Detach करण्यात यावे.</u>**

**माहे मार्च, २०२३ या महिन्यामध्ये झालेल्या बदलींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

**अ) आपल्या महाविद्यालयामधून इतर महाविद्यालयांमध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Relieving | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**ब) इतर महाविद्यालयांमधून आपल्या महाविद्यालयामध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Joining | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत -**

ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कॅस मान्य केल्यामुळे/पदोन्नती झाल्यामुळे अथवा इतर कोणत्याही बाबीमुळे वेतननिश्चिती/सुधारित वेतननिश्चिती झालेली आहे व त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे वेतनामध्ये फरक होत असल्यास त्या अनुषंगानेची माहिती खालील विवरणपत्रामध्ये मायक्रोसॉफ्ट एक्सेलमध्ये सादर करुन याबाबतच्या वेतननिश्चितीच्या मूळप्रतीसह **खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे.**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Reason |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**४) अर्जित रजा रोखीकरण -**

या विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अर्जित रजा रोखीकरणाचे आदेश निर्गमीत केलेले आहेत परंतू अजूनही त्याचे प्रदान झालेले नाही अशा सर्व कर्मचा-यांचे प्रस्ताव खाली जोडलेल्या विवरणपत्रामध्ये खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत खालील कागदपत्रांसह सादर करण्यात यावेत.

ए) या कार्यालयाने संबंधीत कर्मचा-याच्या नावे काढलेल्या आदेशाची प्रत.

बी) लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी **६ व्या वेतन आयोगाचे दिलेले** अंतिम वेतन प्रमाणपत्र.

सी) देय असलेल्या रक्कमेचे परिगणन.

**STATEMENT 1**

**STATEMENT SHOWING THE AMOUNT OF EARN LEAVE ENCASHMENT**

Name of the College – College Code –

| S. N. | Name of the Employee | Designation | Date of Retirement | Order No. & Date | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**५) तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधनाची रक्कम -**

आपल्या महाविद्यालयामध्ये विविध विषयांसाठी रिक्त असलेल्या पदांवर ज्या शिक्षक कर्मचा-यांची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आली होती त्याबाबत आपणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार देय ठरणारी माहे डिसेंबर, २०२२ पर्यंतची रक्कम आपणास अदा करण्यात आलेली असून माहे जानेवारी, २०२३ च्या देय ठरणा-या रक्कमेचे देयक कोषागारात सादर करण्यात आलेले आहे. त्यामुळे आता माहे फेब्रुवारी, २०२३ साठी देय ठरणारी रक्कम आणि सन २०२२-२३ या वर्षासाठी यापूर्वी ज्या तासिका तत्वावर नियुक्त शिक्षकांना त्यांच्या मानधनाची रक्कम अद्यापही अदा करण्यात आलेली नाही अशा सर्व शिक्षकांना देय ठरणा-या मानधनाची माहिती खालील विवरणपत्रामध्ये खाली नमूद केलेल्या ठिकाणी, वेळेत व दिनांकास सादर करण्यात यावी. सदरहू माहिती सादर करतांना खाली दिलेल्या सर्व सूचना विचारात घ्याव्यात.

१. आपल्या महाविद्यालयाची माहिती तयार करतांना महिनानिहाय तयार करण्यात यावी.

२. तासिका तत्वावर नियुक्त करण्यासाठी सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. तासिका तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्यासाठी दिलेल्या जाहिरातीची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

४. आपल्या महाविद्यालयातील ज्या कर्मचा-यांची नियुक्ती तासिका तत्वावर करण्यात आलेली आहे त्यांना दिलेल्या नियुक्तीचे आदेश व रुजू अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-याचे नियुक्तीस आपले महाविद्यालय ज्या अकृषी विद्यापीठाशी संलग्नीत आहे त्यांनी आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याचे नियुक्ती संदर्भात दिलेल्या मान्यतेची प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याने रुजू होते वेळी तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्त असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर दिलेले हमीपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण वरील बाबींवरील आपले प्रस्ताव खाली नमूद केलेल्या तारखांना व वेळेत सादर करावेत.

**६) प्राचार्य मान्यता -**

या विभागाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य/प्रभारी प्राचार्य म्हणून ज्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांची माहिती खालील विवरणपत्रामध्ये **Microsoft Excel मध्ये** खाली नमूद केलेल्या ठिकाणी, वेळेत व दिनांकास सादर करण्यात यावी. तसेच या अनुषंगानेची खालील कागदपत्रेदेखील सोबत सादर करण्यात यावीत.

१. प्राचार्य पदावर सध्या नियुक्त असलेल्या शिक्षकाच्या सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत.

२. प्राचार्य/प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्तीस मान्यता दिलेल्या विद्यापीठाच्या मान्यतेची प्रत.

**STATEMENT SHOWING THE INFORMATION OF PRINCIPAL**

Name of the College - College Code -

| Name of the Principal | Date of Birth | Date of Retire ment | Date of Appointment as Principal | Whether Approval is Regular/ Tenure/ Incharge | If Approval is Tenure/ Incharge pl. mention Period of Approval | Name of the University who has given approval | Approval Order No. | Approval Order Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**७) माहे मार्च, २०२३ चे वेतनासाठी आवश्यक असलेल्या तरतूदीबाबत -**

माहे मार्च, २०२३ च्या वेतनासाठी आवश्यक असणारी तरतूदीबाबतची माहिती खालील विवरणपत्रामध्ये मायक्रोसॉफ्ट एक्सेलमध्ये सादर करुन खाली नमूद केलेल्या ठिकाणी, वेळेत व दिनांकास सादर करण्यात यावी.

| S. N. | Name of the College | Gross Salary | GPF | DCPS | P T | I T | TOTAL | 14% DCPS Govt. Share |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण वरील बाबींवरील आपले प्रस्ताव **हार्ड कॉपी व पेन ड्राईव्हमध्ये बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे** येथे खाली नमूद केलेल्या तारखांना व वेळेत सादर करावेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | २१/०३/२०२३ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | २१/०३/२०२३ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | नाशिक | २३/०३/२०२३ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| ४ | अहमदनगर | २३/०३/२०२३ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |

**सही/-**
(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक(उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे